# संविधानाने आपल्याला काय दिले?



नमस्कार विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

आज मी तुमच्याशी संविधानाविषयी बोलणार आहे. तुम्हांला माहितच आहे की इंग्रजांनी आपल्या देशाला 150 वर्षे लुटले. भारताला भीषण गरिबीत ढकलले. लोकांमध्ये जाती-धर्माच्या नावाने भांडणे लावली. इंग्रज गेल्यावर **अशा परिस्थितीतला देश चालवायचा कसा?** असा मोठा प्रश्न स्वातंत्र्य सैनिकांच्या समोर होता. त्यातूनच निर्माण झाले संविधान.

**मला सांगा, आपली शाळा, कॉलेज चालवण्यासाठी नियम लागतात की नाही?**



**अगदी तसंच देश चालवण्यासाठीचे नियम, विचार ज्या पुस्तकात लिहिले ते पुस्तक म्हणजे भारतीय संविधान.**
**26 जानेवारी 1950 रोजी या संविधानानुसार देशाचा कारभार सुरू झाला. तोच प्रजासत्ताक दिन!**
**अशा प्रजासत्ताक दिनाच्या तुम्हांला हार्दिक शुभेच्छा!**

## किती मोठं आश्चर्य आहे! एवढी विविधता असलेला देश एकत्र राहिला!




जगातले अनेक देश वेगळी भाषा, वेगळी संस्कृती असल्यामुळे वाद होवून वेगळे झाले. आपल्या शेजारचा पाकिस्तान भाषा वेगळी असल्यामुळे 2 देशांत विभागला. परंतु, **एवढी विविधता असलेला आपला देश टिकला तो संविधानामुळे.** त्याचे कारण, **संविधानाने विविधतेचा सन्मान केला.**

व्यक्ती कोणत्याही धर्म, जात, लिंग, प्रांत, भाषा, गरीब वा श्रीमंत असो, प्रत्येक भारतीयाचा भारतावर आणि संविधानावर समान हक्क आहे.

## अजूनही लोकांना माहीत नाही की संविधानाने आपल्याला काय दिले आहे?

भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने स्वातंत्र्य मिळाल्यानंतर **महिलांसह सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क** दिला. गावची ग्रामपंचायत ते देशाच्या लोकसभेपर्यंत निवडणुकीला उभे राहण्याचा हक्कही संविधानामुळेच मिळाला.

## संविधानाने आपल्या गावाला काय दिले?



गाव तिथे शाळा दिली

दवाखाने दिले





रेशन दिले

पाण्याची सोय झाली





लाईट आली



सहकारी दुध डेअरी दिली

## संविधानाने शेतकऱ्याला काय दिले?



पूर्वी शेतकऱ्यांकडे जमीन नव्हती. सरकारने जमीनदार आणि सावकार यांच्याकडून जमीन घेऊन शेतकऱ्यांमध्ये वाटली.



शेतकऱ्यांना बी-बियाणे, कीटकनाशके, पाण्याची सुविधा, वीज स्वस्तात बँकेचे कर्ज दिले.







शेतकऱ्यांच्या पिकाला चांगला भाव मिळण्यासाठी बाजार समित्या सुरू केल्या.

लोकांच्या हातात गावचा कारभार असला पाहिजे ह्या हेतूने **गावात ग्रामपंचायत** आली.

**ग्रामसभेत लोकांना निर्णय घेण्याचा हक्क दिला. हे सर्व संविधानातील लोककल्याणाच्या विचारातून आले.**

## संविधानाने महिलांना काय दिले?

पूर्वीच्या काळी मुलींना **शिकायला बंदी** होती. महिलेला मान नव्हता. ती **'चूल आणि मूल' या चौकटीत कैद** होती.



**संविधानाने महिलांना माणूस म्हणून सन्मान दिला.** संविधानामुळेच महिलांना शिक्षण घेणे, घराबाहेर पडणे, नोकरी करणे शक्य झाले. म्हणूनच आज विविध क्षेत्रात त्या जबाबदारीच्या जागा सांभाळत आहेत.

**घराबाहेर न पडणारी बाई सरपंच पदापासून ते न्यायाधीश, मुख्यमंत्री, देशाची राष्ट्रपती बनली ते संविधानामुळेच.**

## संविधानाने शोषित-वंचित घटकांना काय दिले?

पूर्वी भारतात काही जातीच्या लोकांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. आवडीचे कामधंदे करण्याचा अधिकार नव्हता. संपत्ती जमवण्याचा अधिकार नव्हता. **माणूस म्हणून समजलेच जात नव्हते.**



अशा जनतेला इतर समाजाच्या लोकांसोबत समान स्तरावर आणण्यासाठी **संविधानाने 'आरक्षणा'ची तरतूद केली.**

त्यामुळे आज सर्व प्रकारची लोकं शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर, संशोधक, उद्योगपती, सरकारी अधिकारी बनून सन्मानाचे आयुष्य जगत आहेत.

## संविधान कोणत्या विचारांनी बनले आहे?

विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो, आपलं संविधान सांगतं की माणूस म्हणून आपण सर्व **सारखेच** आहोत. प्रत्येक माणसाला खाण्याचे, बोलण्याचे, फिरण्याचे, विचार करण्याचे, ते व्यक्त करण्याचे **स्वातंत्र्य** आहे. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे वागण्याचा अधिकार आहे. आपण सर्वांनी **एकमेकांसोबत प्रेमाने** राहिले पाहिजे. एकमेकांची **भावंडांप्रमाणे काळजी** घेतली पाहिजे.

**आपल्या संविधानातील विचार हे कुठून बाहेरून आले नाहीत. ते आपल्या देशातीलच आहेत.**

आपल्या अनेक महान संतांची शिकवण संविधानात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांनी ही मूल्ये आत्मसात करून ती समाजात रुजवली.



याच मूल्यांनी म. गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू, मौलाना आझाद, भगतसिंह आणि इतर अनेक नेत्यांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली.

## आपले भारतीय संविधान म्हणजे संतविचार-शिव-शाहु-फुले-आंबेडकरी विचारांचा संगम आहे.

आज आपले सर्व प्रश्न सुटले आहेत, असे नाही. मात्र आपले सर्व प्रश्न सोडवण्याची हमी भारतीय संविधानच देते हे नक्की! हा देश कसा घडवायचा आहे हे संविधान सांगतं. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायाच्या मार्गाने घडवायचा आहे. पण तो घडवणार कोण? **तो घडवणार आपण भारताचे लोक!** संविधान हे **आपणच आपल्याला दिलेले वचन** आहे.

### विद्यार्थ्यांचे नागरिकास पत्र

प्रिय ताई/दादा,

आपलं संविधान हे **जीवंत पुस्तक** आहे, ते आपल्याला कसं जगायचं हे सांगतं. त्यानेच आपल्याला कितीतरी अधिकार दिले.

माझ्यासारखी मुलं - मुली **आवडीचं शिक्षण** घेऊ शकतात ते संविधानामुळेच. भारतीय संविधानानेच सर्वात पहिल्यांदा प्रत्येकाला **मतदानाचा अधिकार** दिला. संविधानाने आपल्याला **खाण्याचे, बोलण्याचे, फिरण्याचे स्वातंत्र्य** दिले. **पाणी, हॉस्पिटल, रेशनिंगचे दुकान, गावाला जायला एसटी, रस्ते** या सुविधा आपल्याला संविधानानेच दिल्या आहेत. संविधानानेच **कामधंदा निवडण्याचा अधिकारही** दिला. संविधान सांगतं, प्रत्येक जण माणूस म्हणून समान आहे. त्यामुळे कुणासोबतही भेदभाव करू नये.

अशा संविधानाची माहिती तुम्हीही लोकांना सांगाल का?

**तुम्हीही माझ्यासोबत बोला - 'जय संविधान!'**

**संविधान जागर अभियान**